लोकमत
हॅलो नागपूर
मंगळवार, दि.२४ ऑक्टोबर २००६

## असंघटित कामगारांच्या सामाजिक सुरक्षेवर राष्ट्रीय अधिवेशन

नागपूर, दि. २३ - असंघटित कामगारांच्या सामाजिक सुरक्षेवर १४ स्वयंसेवी संस्थांतर्फे आयोजित राष्ट्रीय अधिवेशन नागपुरात २६ ते २८ ऑक्टोबरला विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाच्या रा.मा. सभागृहात (मोरभवन)होत असून, या अधिवेशनात सुमारे ६०० प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

अधिवेशनाचे उद्घाटन २६ तारखेस सकाळी १०.३० वाजता होणार आहे. प्रा. श्रीनिवास खांदेवाले, बाबा आढाव, पूर्णिमा, दोराईराजन, उमेश चौबे, डॉ. सुनीलम, डॉ. रूपा कुळकर्णी, प्रा. बोंदरे, सुभाष लोमटे, मनु दत्ता हे मान्यवर या अधिवेशनात मार्गदर्शन करणार आहेत.